मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची बदली होणार?

## डॉ. राजेंद्र भोसले यांच्या नावाची चर्चा..!

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**




पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या जागी अहमदनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांची नियुक्ती होणार असल्याची चर्चा आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बदली होणार असून लवकरच त्यावर निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.वाकड येथील १५०० कोटी रुपयांचा टीडीआर प्रकरणावरुन पिंपरी-चिंचवड शहराची राज्यभरात बदनामी झाली आहे. या प्रकरणात राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचा वरदहस्त असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी मनमानीपणे घेतलेल्या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला असून, त्यांना अभय दिल्यास आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आपल्या उमेदवारांना फटका बसेल, अशी शंका सेना-भाजपाच्या नेत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत उपस्थित केली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी ''भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी अशा तीनही पक्षांना सोबत घेवून काम करेल, असा अधिकारी आपण देवूया तुम्ही नाव सूचवा'' असे आश्वासित केल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, अहमदनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांच्या नावाबाबत चर्चा सुरू आहे. कोरेगाव तालुक्यातील किन्हई येथील रहिवाशी असलेले आणि सातारा येथील सैनिक स्कुलचे माजी विद्यार्थी डॉ. राजेंद्र भोसले यांनी सातारा, सांगली, सोलापूर, पुणे आणि नवी मुंबई अशा ठिकाणी सेवा बजावली आहे. राष्ट्रवादीचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सेनेतील बड्या नेत्यासोबत भोसले यांचा सलोखा आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे आणि भाजपा-सेनेच्या स्थानिक नेत्यांनी डॉ. भोसले यांची पिंपरी-चिंचवडमध्ये आयुक्तपदी नियुक्ती करण्याबाबत खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे आणि आमदार अश्विनी जगताप यांच्यात एकमत झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे लवकरच डॉ. राजेंद्र भोसले यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदी वर्णी लागेल, अशी शक्यता आहे.

### बड्या नेत्यासोबत भोसले यांचा सलोखा

» आयुक्त शेखर सिंह यांनी मनमानीपणे घेतलेल्या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला असून, त्यांना अभय दिल्यास आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आपल्या उमेदवारांना फटका बसेल, अशी शंका सेना-भाजपाच्या नेत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत उपस्थित केली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी ''भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी अशा तीनही पक्षांना सोबत घेवून काम करेल, असा अधिकारी आपण देवूया तुम्ही नाव सूचवा'' असे आश्वासित केल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, अहमदनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांच्या नावाबाबत चर्चा सुरु आहे. कोरेगाव तालुक्यातील किन्हई येथील रहिवाशी असलेले आणि सातारा येथील सैनिक स्कुलचे माजी विद्यार्थी डॉ.राजेंद्र भोसले यांनी सातारा, सांगली, सोलापूर, पुणे आणि नवी मुंबई अशा ठिकाणी सेवा बजावली आहे. राष्ट्रवादीचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सेनेतील बड्या नेत्यासोबत भोसले यांचा सलोखा आहे.

# सारनाथ स्तूप, प्राचीन मंदिरे ही हस्तकलेचा प्राचीन वारसा : गिरीश प्रभुणे

## एच. ए. मैदानावर हस्तकला कारागीर ते थेट ग्राहक विक्री प्रदर्शन

**। पिंपरी-चिंचवड।**

सारनाथ स्तूप आणि देशभरातील प्राचीन मंदिरे, गुहा, लेण्या, अजिंठा, वेरूळ सारखी जागतिक वारसा असणारी ठिकाणे ही तत्कालीन शिल्पकला आणि हस्तकलेचा प्राचीन वारसा आहेत. या कला जपणे आणि पुढच्या पिढी कडे देत रोजगार निर्मितीसाठी राष्ट्रीय गांधी शिल्प बाजार सारखी प्रदर्शने देशभर मोठ्या संख्येने व्हावीत अशी अपेक्षा गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केली.भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालय, विकास आयुक्त कार्यालय (हस्तकला) यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय गांधी शिल्प बाजारच्या वतीने पिंपरीत शुक्रवार पासून राष्ट्रीय हस्तकला आणि हातमाग प्रदर्शनाचे व विक्री दालनाचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार आण्णा बनसोडे, पिंपरी चिंचवड मनपाचे आयुक्त शेखर सिंह, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार (हस्तकला), वरिष्ठ सहाय्यक निर्देशक चंद्रशेखर सिंग, जिल्हाळा महिला विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्ष कविता खराडे आदी उपस्थित होते. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांनी देशभरातून आलेल्या हस्त कारागीरांचे शहर वासियांच्या वतीने स्वागत केले. भारत सरकार (हस्तकला), या राष्ट्रीय प्रदर्शनात देशातील विविध २९ राज्यातील ३५० कारागीर २५० स्टॉलसह पुण्यातील ११ आणि पिंपरी चिंचवड शहरातील ४ स्टॉल सह महाराष्ट्रातील एकूण ५० स्टॉलवर हस्तकला कारागीर पारंपारिक कलाकृती या प्रदर्शनात सादर केली आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर आणि पुण्यातील कलाप्रेमी जाणकारांना कला आणि हस्तकलेचा वारसा पाहण्याची आणि हस्तकला कारागीर ते थेट ग्राहक योजनेतून खरेदीचा आनंद लुटण्याची संधी आहे. त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असेही आवाहन चंद्रशेखर सिंग यांनी केले. सर्व नागरिकांना या प्रदर्शनास मोफत प्रवेश आणि वाहनांसाठी मोफत पार्किंग उपलब्ध करून देण्यात आली आहे. रविवार (दि. ३ मार्च) पर्यंत सकाळी नऊ ते रात्री दहा या वेळेत एच. ए. ग्राउंड, संत तुकाराम नगर, चौपाटी समोर, पिंपरी, पुणे १८ येथे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

# भारत विकसित राष्ट्र करण्यासाठी नारी शक्तीने मोदींना साथ द्यावी : शंकर जगताप

## मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार देशातील या चार घटकांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यात देशातील गरीब, तरूण, शेतकरी आणि महिलांचा समावेश आहे. या चार जातींचा विकास होईल तेव्हाच देशाचा विकास होईल, यावर मोदी सरकारचा विश्वास आहे. या चारही घटकांच्या विकासासाठी मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. भारत विकसित राष्ट्र करण्यासाठी नारी शक्तीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्यावी, असे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात नारी शक्ती वंदन अभियान कार्यक्रम घेण्यात आला.



त्यावेळी ते बोलत होते. शंकर जगताप म्हणाले, नरेंद्र मोदी हे या देशाचे पंतप्रधान झाल्यापासून महिलांचा विकास हा केवळ कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता देशाच्या विकासगाथेच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. भारताच्या प्रगतीमध्ये महिलांनी बजावलेल्या भूमिकेला पंतप्रधान मोदी यांनी कायमच वंदन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प केला आहे. हा संकल्प साध्य करण्यासाठी देशातील महिला शक्ती ही सर्वात मोठी हमी असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले आहे. मोदी सरकार महिला सबलीकरण प्रक्रिया अविरत चालवित आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील हे सरकार विविध प्रभावी योजना व उपक्रमांद्वारे महिला सक्षमीकरणासाठी महिलांना सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने काम करत आहे. महिलांचे सक्षमीकरण ही मोदींची गॅरंटी आहे. त्यांनी नारी शक्ती वंदन कायदा करून महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे स्टँडअप इंडिया योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, महिला कॉयर विकास योजना, महिला समृद्धी योजना, अन्नपूर्णा योजना, स्त्री शक्ती योजना, पंतप्रधान धनलक्ष्मी योजना, फ्री शिलाई मशीन योजना, पंतप्रधान आवास योजनेत महिलांच्या नावे घर, उज्वला गॅस योजना यांसारख्या विविध योजना राबवून महिलांना सक्षम करण्याचा मार्ग तयार केला आहे. या योजनांचा गरजू महिलांनी लाभ घ्यावा. मोदी सरकार लखपती दिदी बनविण्याची योजना राबवित आहे. त्याअंतर्गत देशातील बचत गटातील एक कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्यात आले आहे. आता तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्याचे सरकारचे टार्गेट आहे. तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील महिलांकडून पाठिंबा मागितला आहे. देशाला विकसित राष्ट्र करताना या तीन कोटी महिलांचे मोठे योगदान असणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील महिलांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी आमदार अश्विनी जगताप व भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्षा सुजाता पालांडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या महिला, शून्य कचरा संकल्पात योगदान देणाऱ्या महिला, तृतीय पंथीयांसाठी काम करणाऱ्या महिला तसेच समूह संघटिका, आशा वर्कर यांचा गौरव करण्यात आला. यावेळी आमदार अश्विनी जगताप, भाजपचे प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मेडिगेरी, अजय पाताडे, उपाध्यक्ष राजू दुर्गे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, माजी नगरसेवक सागर अंघोळकर, प्रमोद ताम्हणकर, बिभीषण चौधरी, योगेश चिंचवडे, महिला आघाडी अध्यक्षा सुजाता पलांडे, माजी नगरसेविका सविता खुळे, संगीता भोंडवे, अश्विनी चिंचवडे, मनीषा पवार, अनुराधा गोरखे, शोभा थोरात, ज्योती भरती, कुंदाताई भिसे, भरती विनोदे, कविता हिंगे, बिंद्रा गणात्रा, शारदा मुंढे, स्वाती नेवाळे, पल्लवी पाटकर, कविता खराडे, पल्लवी वाल्हेकर, पियुषा पाटील, समूह संघटिका रेश्मा पाटील, अश्विनी संगेकर, वैशाली खरात, शारदा धनशेट्टी, सुवर्णा भालेराव, मंगला वाडकर, चंचलाताई जमधडे आदी उपस्थित होते.

# 'तुतारी' चिन्ह मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पिंपरीत आनंदोत्सव

## पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा तुतारी वाजवून जल्लोष..!

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांना तुतारी हे निवडणूक चिन्ह जाहीर झाल्याने पिंपरी चिंचवड शहर कार्यकारिणी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने पिंपरी येथे मध्यवर्ती कार्यालयात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. आनंद उत्सवाची सुरवात एचए कॉलनी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला तसेच कार्यकर्त्यांनी फटाके फोडून मोठ्या जल्लोषामध्ये शुभेछा दिल्या. सर्व पदाधिकाऱ्यांनी फेटे बांधून तुतारी या चिन्हाबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी तुतारीवादकांच्या निनादामध्ये आणि आदरणीय शरद पवार साहेबांच्या जयघोषाने पिंपरी चौक परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, तरुण तरुणी, ज्येष्ठ नागरिक व महिला भगिनींनी उत्स्फूर्तपणे हजेरी लावली. आता निनादणार विजयाच्या 'तुतारी', याच हाताने पेटविणार धगधगत्या 'मशाली', महाराष्ट्रात येणार 'महाविकास' आघाडी..! असा नारा देत कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी आनंद उत्सवात जल्लोष केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पवार पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे म्हणाले कि, आम्ही ज्यांच्या मार्गदर्शनात काम करतो त्या माननीय शरद पवार साहेबांनी आयुष्याच्या ५७ वर्षांच्या सक्रिय राजकीय कारकिर्दीत पक्षाचे चिन्ह गेल्याची कधी पर्वा केली नाही. त्यांनी आत्तापर्यंत १४ निवडणुका लढल्या, पैकी पाच निवडणुका अशा होत्या की यामध्ये चिन्ह वेगवेगळी होती. एका निवडणुकीत बैल जोडी नंतर गाई वासरू नंतर चरखा, हात आणि मग घड्याळ या वेगवेगळी चिन्हे राज्यात आणि देशात साहेबांनी पाहिली व अनुभवली आहेत, त्यामुळे कोणाला असं वाटत असेल की ती एकदा संघटनेचे चिन्ह आपण काढून घेतले तर त्या संघटनेचे अस्तित्व संपेल असं कधी होत नसते. त्याचबरोबर सकारात्मक बाब म्हणजे महाराष्ट्राच्या मातीशी, इथल्या परंपरेशी ऐतिहासिक नाळ जोडलेले मंगलवाद्य असणारी तुतारी हे चिन्ह मिळाल्याने जनतेपर्यंत चिन्ह पोचविण्यास जास्त वेळ लागणार नाही. स्वाभिमानी राष्ट्रवादीची हि तुतारी जनसामान्यांच्या मनावर राज्य करेल हि खात्री आहे माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांनी यावेळी तुतारी चिन्ह भेटल्याबद्दल आनंद व्यक्त केला व साक्षात छत्रपती शिवरायांचा हा आशीर्वाद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# पुणे ट्रॅफिकमुक्त बनवण्याचा निर्धार : देवधर

## राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या जयंतीदिनी 'समरसता सेवा पुरस्कारांचे' वितरण



**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, २३ फेब्रुवारी रोजी पुण्यातील परीट समाजाच्या ज्येष्ठांचा तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचा 'समरसता सेवा पुरस्काराने' सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाची संकल्पना मांडणारे भाजपा नेते सुनील देवधर यांनी आपल्या मनोगतात ट्रॅफिक, प्रदूषणमुक्त पुण्याचा निर्धार व्यक्त केला. पुण्याला आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनस्थळ बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रित कार्य करूया असे आवाहन त्यांनी यावेळी केले. शुक्रवारी, वानवडी स्थित महात्मा फुले सांस्कृतिक भवनात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती समारोह समितीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमप्रसंगी माजी खासदार प्रदीप रावत, पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, माजी आमदार जगदीश मुळीक, युवा नेते कुणाल टिळक, अभिनेते अजिंक्य देव, ओबीसी शहर अध्यक्ष नामदेव माळवदे, सामाजिक समरसता मंचाचे नंदकुमार राऊत, संजय गाते, दिनेश होले, लहुजी वस्ताद समाधी समितीचे सुखदेव अडागळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने पुणेकर नागरिक उपस्थित होते. संत गाडगेबाबा वर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट बनवणारे प्रसिद्ध ज्येष्ठ सिनेदिग्दर्शक पद्मभूषण राजदत्त आणि पुणे महापालिकेचे माजी उपमहापौर परीट समाजाचे नेते नाना नाशिककर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. राज्यसभेच्या नवनियुक्त खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी यांचा देखील विशेष अभिनंदनपर सन्मान करण्यात आला. यासमवेत १०० पेक्षा अधिक स्वच्छता करणाऱ्या हातांना यावेळी सन्मानित करण्यात आले. संत गाडगेबाबा यांनी समाज जागृतीचे मौलिक कार्य केले. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी बनवलेला 'देवकी नंदन गोपाला' हा चित्रपट पाहिला आणि गाडगेबाबा यांच्या विषयी अधिकची माहिती झाली. त्याचप्रमाणे गाडगेबाबा यांच्याकडूनच प्रेरणा घेऊन तरूणांनी पंढरपूर वारी दरम्यान निर्मलवारी सुरु केली. याच पार्श्वभूमीवर आपणही स्वच्छता राखून, पुण्याला स्वच्छ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनस्थळ बनवूया, असा निर्धार सुनील देवधर यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहिलेले भाजपा राष्ट्रीय ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष डॉ. के. लक्ष्मण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या अनेक योजनांच्या माध्यमातून राष्ट्रसंत गाडगेबाबांचे स्वप्न कसे साकार करीत आहेत ते विस्ताराने सांगितले. यावेळी बोलताना माजी आमदार जगदीश मुळीक म्हणाले,नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता अभियान सुरु केले. आता आपल्याला येणाऱ्या काळात २०२७ सालापर्यंत पुण्याला स्वच्छ शहर बनवायचे आहे. त्याचप्रमाणे पुणे शहरात सुनील देवधर सातत्याने काम करत आहेत. विविध कार्यक्रम राबवत आहेत. ते पुण्याचेच आहेत. प्रचारक म्हणून त्यांनी पुर्वोत्तर राज्यांत काम केले आहे. त्यासाठी त्यांचे अभिनंदन करतो.''

### पुणेकरांचेच आशीर्वाद आहेत

» राज्यसभा खासदार म्हणून मला पक्षाने संधी दिली असून, हे पुणेकरांचेच आशीर्वाद आहेत, येणाऱ्या काळात पुण्यातील कामासाठी प्रामाणिकपणे काम करेन'', अशा भावना राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. यावेळी माजी उपमहापौर नाना नाशिककर म्हणाले की, ''पुरस्कार देऊन ज्यांचा आज आपण सन्मान केला, ती सर्व मंडळी गेली अनेक वर्ष समाजाचे काम करत आहेत. गाडगेबाबांच्या विचारांचे हे कार्य असेच अविरत सुरु ठेवावे!'' परीट समाजातील या स्वच्छता करणाऱ्या माता भगिनींना सन्मानित केल्याबद्दल त्यांनी सुनील देवधर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले! कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंदार खराडे यांनी केले.

# मोदींच्या 'गॅरंटी'ला 'तारीख' नाही! शरद पवार यांची टीका

## सत्तेचा वापर विरोधकांना तुरुंगात टाकण्यासाठी : शरद पवार

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
केंद्र सरकार अनेक गोष्टींची हमी (गॅरंटी) देत आहे. मात्र त्यांच्या हमीला तारीख नाही आणि धनादेशीही वठत नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. गेल्या सत्तर वर्षांत अनेक राज्यकर्ते पाहिले. भाजपचे अटलबिहारी वाजपेयी यांचेही सरकार पाहिले. मात्र गेल्या दहा वर्षांत मोदी यांची भूमिका देशाला दिशा देणाऱ्या व्यक्तींविषयी जनतेच्या मनात घृणा निर्माण करण्याची आहे. त्यामुळे लोकशाहीची चिंता वाटत आहे. नेहरू आणि त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ले करण्याचा आणि त्यांना बदनाम करण्याचा एककलमी कार्यक्रम मोदी यांचा आहे, असा आरोपही त्यांनी केला. इंडिया आघाडीचा पहिला मेळावा शनिवारी काँग्रेस भवनात झाला. या मेळाव्यात पवार यांनी मार्गदर्शन केले. या मेळाव्याला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, ठाकरे गटाचे पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन अहिर, खासदार सुप्रिया सुळे, चंद्रकांत हंडोरे, आमदार



रवींद्र धंगेकर, डॉ. विश्वजित कदम, काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय मोरे आणि गजनान थरकुडे उपस्थित होते.पवार म्हणाले की, सत्तेचा वापर विरोधकांना तुरुंगात टाकण्यासाठी आणि त्यांच्यावर दबाव टाकण्यासाठी केला जात आहे. विरोधी विचारावर घाव घालण्याचे काम सुरू आहे. हे चित्र बदलण्यासाठी आणि भाजपला पराभूत करण्यासाठी भविष्यातील संकटांची माहिती सामान्य माणसाला द्यावी लागणार असून भाजप विरोधी सर्व विचारधारांना त्यासाठी एकत्र यावे लागेल.देशाच्या विकासात भरीव योगदान असलेल्यांवर मोदी हल्ला करत असल्याचे त्यांच्या भाषणातून दिसते. नेहरू यांनी देश प्रगतीच्या पथावर नेला, हे संपूर्ण जग मान्य करत आहे. मात्र मोदींना ते अमान्य आहे. राज्यकर्ते सामान्यांच्या हिताचे रक्षण करणारे आहेत, असे वाटत नाही. देशाला पोसणारा शेतकरी संकटात आहे. दिल्लीच्या सीमेवर वर्षभर आंदोलन सुरू आहे. मात्र त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. नेहरू, गांधी आणि वाजपेयी यांचे सरकार असताना केंद्र आणि राज्यात समन्वय होता. मात्र गेल्या दहा वर्षांत राज्यांचा सन्मान केला जात नाही. त्यातच एखाद्या राज्यातील विचारधारा वेगळी असेल तर वेगळी भूमिका घेतली जाते. त्यामुळे प्रश्नही प्रलंबित राहत आहेत.

ज्यांनी लाठ्याकाठ्या खाऊन भाजपला सत्तेवर आणले, ते आज कुठेच दिसत नाहीत. सत्तेच्या पंगतीत भलतेच जेवताना दिसत आहेत. ज्यांनी अशोक चव्हाणांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले.

# ४० वर्षांनी शरद पवार रायगडावर गेले

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर खोचक टीका

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाला तुतारी हे चिन्ह दिले आहे. या चिन्हाच्या अनावरणाचा सोहळा राष्ट्रवादीकडून किल्ले रायगडावर ठेवण्यात आला होता. या सोहळ्यासाठी तब्बल ४० वर्षांनंतर शरद पवार रायगड किल्ल्यावर गेले. यावरुन आता भाजपा आणि मनसेने शरद पवारांवर उपरोधिक टीका केली आहे. पुण्यात माध्यमांशी बोलत असताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला एकाच गोष्टीचा आनंद वाटतो की, ४० वर्षांनंतर शेवटी शरद पवार रायगडावर गेले. अजित पवारांना याचे श्रेय द्यावेच लागेल. ४० वर्षांनंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नमन करण्यासाठी जावं लागलं.अजित पवार यांच्यामुळे अखेर शरद पवार यांना रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नमन करण्यासाठी जावं लागलं, याचा आनंद वाटतो असे सांगताना देवेंद्र फडणवीस यांनी तुतारी चिन्हावर भाष्य केलं. तुतारी कुठे, कशी वाजते? हे भविष्य काळात दिसेलच, असेही ते म्हणाले.पुण्यात गेल्या काही दिवसांत हजारो कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. याबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुणे पोलिसांचे अभिनंदन करायला हवे. पोलिसांनी अतिशय शिताफीने अमली पदार्थांचा साठा शोधून काढला आहे. सरकारकडून 'झिरो ड्रग्ज पॉलिसी, नो टोलरन्स फॉर ड्रग्ज' असे धोरण आखले आहे. केवळ मुद्देमाल पकडून थांबू नका, तर त्याही पुढे जाऊन त्याच्यापाठी असलेल्यांना शोधून काढण्याचे आदेश गृहखात्याने दिले होते. नेमकं ते काम पोलिसांनी केलं. त्यामुळे पुण्यात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचा साठा मिळाला. पुणे पोलीस आता केंद्राच्या नार्को टिक्स विभागाबरोबर काम करून आणखी खोलात जाऊन तपास करणार आहेत. अनेक राज्यात अमली पदार्थाविरोधी कारवाई करणे आवश्यक आहे. पुणे पोलिसांच्या यशामुळे देशभरातील कारवायांना बळ मिळणार आहे.महायुतीमध्ये जागावाटपाची योग्य पद्धतीने चर्चा सुरू आहे. आमची एक बैठक झालेली असून आणखी एक बैठक घेतली जाणार आहे. आम्ही लवकरच जागावाटपावर निर्णय जाहीर करू, अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी जागावाटपासंदर्भात बोलताना दिली. तसेच राहुल नार्वेकर आणि नारायण राणे यांना उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा आहे.



### तुतारी कुठे, कशी वाजते?

» पुण्यात माध्यमांशी बोलत असताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला एकाच गोष्टीचा आनंद वाटतो की, ४० वर्षांनंतर शेवटी शरद पवार रायगडावर गेले. अजित पवारांना याचे श्रेय द्यावेच लागेल. ४० वर्षांनंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नमन करण्यासाठी जावं लागलं.अजित पवार यांच्यामुळे अखेर शरद पवार यांना रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नमन करण्यासाठी जावं लागलं, याचा आनंद वाटतो असे सांगताना देवेंद्र फडणवीस यांनी तुतारी चिन्हावर भाष्य केलं. तुतारी कुठे, कशी वाजते? हे भविष्य काळात दिसेलच, असेही ते म्हणाले.पुण्यात गेल्या काही दिवसांत हजारो कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. याबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# बारामती लोकसभा निवडणूक कोण जिंकणार?

## संजय काकडेंनी मांडलं संपूर्ण मतदारसंघाचं गणित

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी, अशी मागणी. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून होत आहेत. त्याचबरोबर गेल्या काही दिवसांपासून सुनेत्रा पवार या अनेक राजकीय व्यासपीठांवर दिसू लागल्या आहेत. दुसऱ्या बाजूला उपमुख्यमंत्री अजित पवार हे सातत्याने बारामतीत जनसंपर्क वाढवत आहेत. बारामतीतल्या लहान-मोठ्या राजकीय आणि सामाजिक कार्यक्रमांना हजेरी लावत आहेत. अजित पवार हे आगामी निवडणुकीत बारामतीच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळेंविरोधात मोर्चेबांधणी करत आहेत. सुनेत्रा पवार यांना लोकसभा निवडणुकीत जिंकवण्यासाठी अजित पवारांचे प्रयत्न चालू असल्याचं बोललं जात आहे. अशातच अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले, बारामती मतदारसंघातून, जनतेमधून आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांमधून मागणी होत आहे की, सुनेत्रा पवार यांनी लोकसभा लढवावी.



दरम्यान, बारामतीमध्ये सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे असा सामना होईल, असं वक्तव्य भाजपाचे माजी खासदार संजय काकडे यांनी केलं आहे. संजय काकडे म्हणाले, माझ्या माहितीप्रमाणे बारामतीत सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशीच लढत होईल, तशीच सध्या चर्चा चालू आहे. त्याचबरोबर सुनेत्रा वहिणी निवडून यायला काहीच अडचण नाही असं चित्र सध्या दिसतंय. मागील लोकसभा निवडणुकीत खडकवासला भागात भाजपाला मोठं मताधिक्य मिळालं होतं. तर भोर, पुरंदर आणि दौंडमध्येदेखील भाजपा उमेदवाराला सुप्रिया सुळेंपेक्षा अधिक मतं मिळाली होती. राहिला प्रश्न बारामतीचा तर बारामतीत अजित पवारांचं मोठं वजन आहे. अजित पवार स्वतः तिथे लीड घेतील.भाजपा नेते संजय काकडे म्हणाले, तरुण मतदारांना अजित पवार हवे आहेत. इंदापूरमध्ये दत्तात्रय भरणे आणि हर्षवर्धन पाटील या दोन नेत्यांचा प्रभाव आहे. हे दोन्ही नेते आत्ता आमच्याबरोबर आहेत. हे दोन्ही नेते आगामी लोकसभेला राष्ट्रवादीसाठी काम करतील. बारामती लोकसभा मतदारसंघातील सर्वच मोठे नेते आमच्याबरोबर आहेत. केवळ काँग्रेसचे संजय जगताप, संग्राम थोपटे आणि स्वतः सुप्रिया सुळे हे तीनच नेते त्या बाजूला आहेत. हे तीन नेते सोडले तर तिथल्या कार्यकर्त्यांना, मतदारांना चौथा नेता दिसत नाही.